क्र.मरारविम/०२/भूमी विभाग/नामुंशिसंद्रुमा/विउवा/२०१७/ १५७३
दिनांक : .११.२०१७

27 NOV 2017

प्रति,

१. महानगर आयुक्त
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी विकास प्राधिकरण,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

३. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी (प्राधिकरण)
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

४. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
उद्योग सारथी, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.

५. व्यवस्थापकीय संचालक
शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित
बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित**

*(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)*

Company Secretariat
Inward No. 537
Date: 05/12/17
M33A

विषय : नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृद्धी महामार्ग) "नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे लिमिटेड" या नावाने विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) स्थापन करण्यास मान्यता.

संदर्भ : शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१/रस्ते ८, दिनांक २२.११.२०१७

महोदय,

नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृद्धी महामार्ग) प्रकल्पाकरिता "नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे लिमिटेड" या नावाने विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) स्थापन करण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २२.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

०२. उक्त शासन निर्णयातील अनुक्रमांक (३) नुसार प्रकल्पाकरिता घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या अनुषंगाने महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी विकास प्राधिकरण, उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी (प्राधिकरण), महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित यांना सदर दुय्यम कंपनीत संचालक म्हणून नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

CIDCO (SP)
INWARD NO. 1976
DATE: 4/12/17

**निगम कार्यालय** : वांद्रे रेक्लेमेशन डेपोसमोर, लिलावती हॉस्पिटल जवळ, के.सी. मार्ग, वांद्रे (प), मुंबई - ४०० ०५०.
**दूरध्वनी** : ०२२-२६४००१९०/२०१, २६५५८१७५/७६ **फॅक्स:** ०२२-२६४१७८९३
**नोंदणीकृत कार्यालय:** नेपियनसी रोड, प्रियदर्शिनी पार्क शेजारी, मुंबई - ४०० ०३६.
**दूरध्वनी:** ०२२-२३६८ ६५०५/०६९१ ३७८९ / २३६९ १०३०
**वेबसाईट:** www.msrdc.org **सीआयएन** : U45200MH1996SGC101586

F:\MSRDC\Letters\MSCEW - SPY Formation.docx

०३. उक्त शासन निर्णयाची प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

०४. सदरचे पत्र मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सहपत्र - वरीलप्रमाणे

आपला

(किरण कुरुंदकर भा.प्र.से.)
सह व्यवस्थापकीय संचालक (प्रशासन व वित्त)

प्रत - आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. कंपनी सचिव, म.रा.र.वि.म. मर्या., मुंबई
२. विधी अधिकारी, म.रा.र.वि.म. मर्या., मुंबई
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी. म.रा.र.वि.म. मर्या., मुंबई

पृ.२५

नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृद्धी महामार्ग) प्रकल्पाकरीता नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेसवे लिमिटेड या नावाने विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग

शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१/रस्ते-८

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २२ नोव्हेंबर, २०१७.

वाचा : १. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.खाक्षेस-२०१६/प्र.क्र.४६७/रस्ते-८, दिनांक : १९ ऑगस्ट, २०१६

२. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.खाक्षेस-२०१६/प्र.क्र.२५१/रस्ते-८, दिनांक : ५ जुलै, २०१६

३. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.खाक्षेस-२०१६/प्र.क्र.३११/रस्ते-८, दिनांक : ५ जुलै, २०१६

प्रस्तावना :-

मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने दिनांक ३०.११.२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये नागपूर-मुंबई द्रुतगती मार्गाची ग्रीनफिल्ड अलाईनमेंट करण्यास व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यारा कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक १९.०८.२०१६ अन्वये या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांची कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नियुक्ती केली आहे.

मंत्रीमंडळाच्या दिनांक ०५.०७.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये नियोजित नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्गाची निर्मिती व तदनुषंगिक कामासाठी लॅण्ड पुलिंग योजनेंतर्गत जमीन संपादनासाठी विकसित जमिनीच्या स्वरुपात मोबदला प्रदान करण्यास व तदनुषंगिक बाबींस मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक ०५.०७.२०१६ अन्वये नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्गाची निर्मिती व तदनुषंगिक कामासाठी लॅण्ड पुलिंग योजनेंतर्गत भूधारकासाठी भागीदारी / देय व अनुज्ञेय लाभांस मान्यता दिली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०५.०७.२०१६ अन्वये या प्रकल्पांसाठी उक्त लाभांमध्ये बदल करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रीमंडळ उपसमितीचे गठन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०१६ च्या कलम १९जे नुसार जे जमीन मालक किंवा हितसंबंधित व्यक्ती जमीन एकत्रीकरण योजनेत स्वेच्छेने सहभागी झाले नसतील अशा जमीन मालकांची किंवा हितसंबंधित व्यक्तींची जमीन ही, जमीन संपादनासाठी लागू असलेल्या कायद्यानुसार संपादित करता येईल, अशी तरतूद आहे. त्यामुळे जमीन एकत्रीकरण योजनेद्वारे अथवा खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात न आलेल्या जमिनी भूसंपादनासाठी लागू असलेल्या कायद्यानुसार संपादित करण्यात येणार आहेत.

नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग या प्रकल्पाची अंमलबजावणी, निधी उभारणी व तद्नुषंगिक कामकाजाच्या अनुषंगाने विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) कंपनी स्थापित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृद्धी महामार्ग) या प्रकल्पाची अंमलबजावणी, निधी उभारणी व तद्नुषंगिक कामकाजाच्या अनुषंगाने खालील नमूद बाबींना मान्यता देण्यात येत आहे :-

१) ~~महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांची~~ [redacted] म्हणून [redacted] या नावाने विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) स्थापित करण्यास व त्यासाठी कंपनी अधिनियमांतर्गत विहित नोंदणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) च्या भागभांडवलापैकी किमान ५१ % भागभांडवल पूर्ण सवलत कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे (MSRDC) राहील.

३) तसेच प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या अनुषंगाने महानगर **आयुक्त**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, **मुख्य कार्यकारी अधिकारी**, झोपडपट्टी विकास प्राधिकरण, **उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी (प्राधिकरण)**, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, **उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, **व्यवस्थापकीय संचालक**, शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादीत यांना सदर दुय्यम कंपनीत संचालक म्हणून नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त विदेश कंपनीची गुंतवणूक व सहमालकीची तरतूद, तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व केंद्र शासन मान्य विदेशी गुंतवणूक करणाऱ्या कंपनीमधील भागीदारी किती असावी ते आर्थिक बाबी तपासून ठरविण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) कडे हस्तांतरीत करावयाच्या जमिनीबाबत लावावयाच्या अटी व शर्तीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला

देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच, महामंडळाने सदर जमीन संपूर्ण मोबदला देवून थेट खरेदी पध्दतीने संपादित केल्या असल्याने त्या भोगवटादार वर्ग-१ मध्ये राहतील. तसेच, जी शासकीय जमीन महामंडळाला हस्तांतरीत करण्यात येईल, त्याचा आर्थिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने त्याही भोगवटादार वर्ग-१ मध्ये असण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) विशेष उद्देश वाहन (Special Purpose Vehicle) कडे हस्तांतरीत करण्यात येणाऱ्या जमिनीबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला अधिकार देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११२२११४७१८६८१८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Avinash Trimbakrao Dhondge

Digitally signed by Avinash Trimbakrao Dhondge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Division East, postalCode=411001, st=Maharashtra, 2.5.4.20=c027c83219049ab50c11c45a886d96689cd2[illegible]
80536900a21e1d9a74b, serialNumber=4be0cd9a533d89e3ab5f3d01c4460[illegible]
0754f79095f947378c30d155, cn=Avinash Trimbakrao Dhondge
Date: 2017.11.22 11:51:06 +05'30'

(अविनाश त्रिं. धोंडगे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत -

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव (महसूल व वन विभाग), मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (विधि व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई
१२) सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि. महामंडळ, वांद्रे, मुंबई-५०
१४) सर्व मंत्रालयीन विभाग
१५) निवड नस्ती (रस्ते-८), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई